नि.दि.दा.क्र. १७/२०१७ मधील नि.क्र. १०७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जास प्रतिवादीने म्हणणे देवून विरोध दर्शविला आहे.

२. वादीच्या कथनानुसार वादी याने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल केला आहे. दाव्यात सर्व सहहिस्सेदांना सामिल केले आहे. दावा टंकलेखनाच्यावेळी नजरचुकीने दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ब च्या नावामध्ये काही चुक झालेली आहे. प्रतिवादी क. १ ब यास रजिष्टर पोष्टाने समन्स पाठविले असता नावात फरक असल्यामुळे समन्स घेण्यास नकार दिला. प्रतिवादी क्र. १ब ची माहिती घेतली असता त्याचे नाव 'सुर्यंकात लक्ष्मण राणे' असे नसून 'चंद्रकांत लक्ष्मण राणे' असे आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ब च्या नावामध्ये ' सुर्यकांत ' ऐवजी ' चंद्रकांत' अशी दुरुस्ती दाव्यामध्ये करणे आवश्यक झाले आहे. सदरचा दावा हा वाटप होवून पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केला असून दाव्याचे कामी कोणतीही तांत्रिक उणीव राहू नये यासाठी प्रतिवादीच्या नावामध्ये सदरच्या दुरुस्ती सुचविलेल्या आहेत. सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरूपाची असून त्यामुळे मूळ दाव्याचे स्वरूप बदलत नाही. सदर कामी जादा गुंता निर्माण होवू नये व एकाच दावेमध्ये वादी, प्रतिवादींचे दरम्यानचे वादाचे निराकरण होणेसाठी सदरचा दावा दुरूस्त करणेविषयी विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्ज खोटा असल्यामुळे तो खर्चासह नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी मागणी केल्यानुसार दुरूस्ती करू शकतो काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

५. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दोन्ही बाजूंचे म्हणणे, कागदपत्रे व एकंदरीत वस्तुस्थिती विचारात घेता सदरचा दावा हा वाटप व पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केला असून प्रतिवादी क्र. १ ब च्या नावामध्ये दुरुस्ती करु इच्छित आहे. वादीच्या कथनानुसार दावा मिळकती हया एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकती असून वर नमूद प्रतिवादींचा सुध्दा दावा मिळकतीमध्ये हक्क व हिस्सा आहे. त्यामुळे दाव्यात कोणतीही तांत्रिक उणिव राहून नये म्हणून दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी क्र. १ब च्या नावामध्ये दुरुस्ती वादी करू पहात आहे. वादीने मागितलेल्या दुरूस्तीमुळे दावा मिळकतीमधील वादीच्या व प्रतिवादींच्या हक्काबाबत निराकरण करणे सोईचे होणार असून कोणताही नवीन विषय घुसडला जात नाही.

६. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध न्यायनिवाडयानुसार दुरूस्ती मंजूर करण्यामागे दाव्यातील वाद परिणामकारकरित्या सोडवून दावेतील पक्षकारांचे हक्क ठरविणे आवश्यक आहे. वादी मागत असलेल्या दुरूस्तीचा मजकूर पाहिला असता त्याव्दारे मूळ दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही. उलट सदर दुरूस्तीव्दारे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असले वादाचे

निराकरण एकाच दाव्यामध्ये करणे शक्य होणार असून प्रकरणांची संख्या वाढून गुंता निर्माण होणार नाही.

७. कायदयाच्या प्रस्थापित तत्वानुसार दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दुरूस्ती अर्ज विचारात घेताना दाव्याच्या गुणावगुणांचा विचार करणे जरूरीचे नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ याचा मूळ उद्देश असा आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचा मूळ मुद्दा शोधून काढण्यासाठी खरी परिस्थिती अभिलेखावर आणून योग्य व न्याय दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

८. वर नमूद प्रस्थापित तत्व आणि अभिलेखावरील वस्तुस्थिती लक्षात घेता सदरील अर्जामध्ये तथ्य असून सदरची दुरूस्ती ही न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे मूळ दाव्यात बदल होणार नाही अगर स्वरूपही बदलणार नाही. दाव्याच्या सुनावणीचे काम अदयापही सुरू झालेले नाही. सबब, अर्जातील दुरूस्ती करणेस हरकत नाही या निर्णयाप्रत मी आलो आहे तथापी विलंबासाठी वादीवर खर्च लादणे यथोचीत वाटते. करिता मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देवून पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने योग्य मुदतीत दावा दुरूस्ती करून पुढील पुर्तता करावी.

( सलीम अ. जमादार )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर कणकवली.

दिनांक : ०५/०१/२०२२.